# माओवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले.

**-अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

माओवाद्यांनी पुन्हा हल्ला केला. ज्यात सीआरपीएफ आणि छत्तीसगड पोलिसांचे अनेक जवान मारले गेले. ते भारताच्या रक्षणासाठी शहीद झाले.

भारत माओवाद्यांच्या हल्ल्याचा सामना करत आहे आणि ही एक गंभीर समस्या बनली आहे. मध्य भारतातील मोठ्या संख्येत आदिवासी जिल्हा हा माओवाद्यांच्या नियंत्रण आणि प्रभावाखाली आहे. तो माओवाद्यांचा प्रभुत्त्वाखालील विस्तार आहे. त्या विस्तारातील मोठ्या प्रमाणातील नागरिक दलित आहेत. तेथील जिल्ल्ह्यांत प्रशासकीय कामगीरी फार कमी प्रमाणात चालते. हे माओवादी कर एकत्रित करतात. त्यांचे नेमलेले स्वयंसेवक प्रत्येक गावातील कर गोळा करुन त्यांना देतात. ते खुप सशस्त्र आहेत. माओवादी हे समाज सुधारणारे नाहीत. माओवाद एक गरिबी निवारण योजना नाही. ते भारताच्या संसदीय लोकशाहीचा विनाश पाहत आहेत आणि वैचारिक हुकूमशाहीच्या जोरावर बदला घेण्याचे त्यांचे वैचारिक आंदोलन आहे. माओवाद्यांच्या विचारधारेत लोकशाही नाही, स्वातंत्र्य नाही, जीवन आणि स्वातंत्र्यासाठी कोणता अधिकार नाही, कायदा किंवा नियम नाही, कोणताही वाणीस्वातंत्र्य नाही. वैचारिक हुकूमशाहीची विचारधारा असलेले लोक संपूर्ण जगात पाहावयास मिळतात, जे अन्य लोकांवर अत्याचार करत असतात.

माओवाद्यांचा सामना कसा करायचा हा प्रश्न आहे. मात्र माओवादी प्रदेशांच्या आर्थिक प्रगतिच्या गोष्टींनी माओवादाची जोखिम दूर होईल असे नाही. हे एक अर्ध सत्य सुद्धा नाही. कोणत्याही सरकारसाठी माओवाद्यांच्या प्रभावाखालील विस्तारात दाखल होण्यासाठी शांतीची पुनर्रस्थापना करणे गरजेचे आहे. त्या विस्तारातील सुरंग दूर करावी लागतील. माओवाद्यांच्या हातातील शस्त्रांवर नियंत्रणा लादावे लागेल. नागरिकांकडून वसूल करण्यात येत असलेल्या खंडणीचा अंत करावा लागेल. ज़िल्हा प्रशासन अथवा पीडब्ल्युडीच्या कंत्राटदारांना तिथे दाखल करावे लागेल आणि शाळा, कॉलेज, हॉस्पिटल, पंचायत भवन वगैरे इमारतींचे निर्माण करुन विकास साधणे सुरु करावे लागेल.

या विस्तारात हातबॉब आणि दारुगोळा पुरविणारे स्त्रोत नाहिसे करावे लागेल. माओवादी संपूर्ण सीमेपलिकडून स्मगलिंग करुन किंवा पोलिस शस्तगार लूटून शस्त्र एकत्र करत आहेत. माओवादी मानत आहेत की, शत्रूचे शस्त्रागार माओवाद्यांचे शस्त्रागार आहे. यासंदर्भात शत्रू राज्य सरकार अथवा पोलिस आहे.

कुठपर्यंत भारतातील सामान्य नागरिक आणि सुरक्षा कर्मचारी हिंसेचे लक्ष होतील? आपण त्यांना त्या प्रदेशाच्या विकास अजेंड्यात कशाप्रकारे सामावून घेऊ शकू? आपण कधीपर्यंत तेथील आदिवासी वस्तीतील लाभासाठी बनलेल्या इमारती आणि संपत्तीचे नाश करायला देऊ? राष्ट्रीय संपत्तीवर प्रथम अधिकार आदिवासींचे असल्याचे स्पष्ट करावेच लागेल. आपल्याला आदिवासींना माओवादी बनण्यापासून रोखले पाहिजे. त्यांना आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले पाहिजे. माओवादासमोरील युद्ध कधी अर्धे युद्ध बोलू शकत नाही. भारत त्याचा संपूर्णपणे सामना करण्याचे सामर्थ्य ठेवतो.